# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ.

## (परीक्षा विभाग)

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड, गडचिरोली–४४२६०५
दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०

जा.क्र./गों.वि./परीक्षा वि /६९२/२०१५ दिनांक: २९/०६/२०१५

## परिपत्रक

**(For On Screen Revaluation)**

सर्व संबधित महाविद्यालयातील प्राचार्याना व विद्यार्थ्याना सूचित करण्यात येते की,उन्हाळी २०१५ मध्ये परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्याना त्यांच्या उत्तरपत्रिकेचे मुल्यांकन (अभियांत्रिकी,विधी,औषधीशास्त्र विद्याशाखा आणि एम.बी.ए.अभ्यासक्रम) on Screen पध्दतीने झालेले आहे, त्या विद्यार्थ्यानी Hardcopy (Photocopy), आणि Challenge To Valuation (Revaluation) यासाठी गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोलीचे निर्देश क्रमांक १७८/२०१५ नूसार खालील पध्दतीचा अवलंब करावा.

### १) Procedure For Hardcopy (Photocopy) Application

विद्यार्थ्याना त्यांच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मुल्यांकनाकरीता Hardcopy साठी अर्ज करावा लागेल. सदर विद्यार्थ्यानी त्यांच्या महाविद्यालयामध्ये जावून निकाल घोषीत झाल्याच्या ५ दिवसाच्या आत Online पध्दतीने अर्ज करावा. त्याकरीता प्रतिपेपर ३००/- रूपये शुल्क आकरण्यात येईल. संबंधीत महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयामध्ये भरलेले अर्ज विद्यापीठामध्ये २ दिवसाच्या आत जमा करावे,या सदराखाली त्यांच्या उत्तरपत्रिकेची Hardcopy (Photocopy) देण्याची कार्यवाही घेण्यात येईल. **(फक्त दोन विषयाकरीता)** या करीता संबंधित महाविद्यालयाच्या Log in वर Hardcopy (Photocopy) देण्यात येईल व याबाबतची सुचना विद्यापीठ संकेतस्थळावर देण्यात येईल.महाविद्यालयानी संबधित विद्यार्थ्याला ३ दिवसात Hardcopy (Photocopy) उपलब्ध करून द्यावी. ही जबाबदारी सर्वस्वी महाविद्यालयाची राहील.

### 2 Precedure For Challenge To Valuation (Revaluation) Application

विद्यार्थ्याना त्यांच्या उत्तरपत्रिकेची Hardcopy (Photocopy) प्राप्त झाल्यानंतर Challenge To Valuation (Revaluation) करावयाचे असल्यास ताबोडतोब २ दिवसाच्या आत संबधित महाविद्यालयामध्ये जावून Online पध्दतीने अर्ज करावा. पुनर्मुल्यांकनासाठी प्रतिपेपर १५०/– रूपये शुल्क आकरण्यात येईल. विद्यार्थ्याने संबंधित महाविद्यालयामध्ये online अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयाने त्यांना प्राप्त अर्ज २ दिवसाच्या आत विद्यापीठामध्ये जमा करणे आवश्यक राहील. **(फक्त दोन विषयाकरीता)** ज्या विद्यार्थ्याने Hardcopy साठी अर्ज केला असेल अशाच विद्यार्थ्याना Challenge To Valuation (Revaluation) करीता अर्ज करता येईल.

महाविद्यालयाने धनाकर्ष हा कोणत्याही राष्ट्रीय कृत बॅकेचा व तो **''वित्त व लेखा अधिकारी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली''** यांचे नावे काढावा किंवा विद्यापीठामध्ये रोखीने सुध्दा पैसे भरता येईल.

**नोट** :– अभियांत्रिकी,विधी,औषधीशास्त्र विद्याशाखा आणि एम.बी.ए.अभ्यासक्रम या पैकी ज्या विषयाचे निकाल घोषीत झालेले आहेत अशा विषयाकरीता पुनर्मुल्यांकन करावयाच्या कार्यवाही करीता असलेली मुदत ही परीपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन ग्राहय धरण्यात येईल,याची सर्व महाविद्यालय व विद्यार्थ्यानी नोंद घ्यावी. Hardcopy(Photocopy),आणि ChallengeToValuation (Revaluation) ची प्रक्रिया www.gondwanaexam.org संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

परीक्षा नियंत्रक
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली